REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 8 | MAY - 2018

# जागतिक स्तरावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान



डॉ. संभाजी मलघे
इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव, पुणे.

## प्रस्तावना :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जगाला विविध अंगांनी ओळख आहे. डॉ. आंबेडकरांनी विविधक्षेत्रात आपले योगदान दिले आहे. समग्र सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी ह्यातभर दिलेला लढा जगासाठी एक मोठी प्रेरणा आहे. जगातील सर्वच शोषित, वंचित, बहुजन, वर्ण भेदाने पिळलेल्या, पिचलेल्या माणसांसाठी ते प्रेरणास्त्रोत आहेत. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानवंशशास्त्र, अर्थ, समाजशास्त्र, शेती, वृत्तपत्रविद्या, सहकार, आदी क्षेत्रात उमटवलेला ठसा जगाच्या दृष्टीने मोलाचा आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार मानल्या गेलेल्या आंबेडकरांच्या तत्वविचारांचा अभ्यास जगभरातील जाणकारांना, समाजकारणी लोकांना आवश्यक वाटतो यातूनच डॉ. आंबेडकरांच्या विचार कार्याचे मोल आधोरेखित होते. कोलंबिया विद्यापीठाने त्यांचा केलेला गौरव म्हणजे त्यांच्या ज्ञानाला, कार्याला, दृष्टेपणाला दिलेली विनम्र मानवंदना आहे. Symbol of Knowledge म्हणजे ज्ञानाचे प्रतीक म्हणजे डॉ. आंबेडकर हा त्यांचा यथार्थ गौरव केला गेला आहे.

## नव्या संस्कृतीची उभारणी आणि बौद्ध संस्कृतीशी तिची क्रांतिकारक जोडणी

सनातन प्रतिगामी विचारांनी आणि वर्णव्यवस्थेने बरबरटलेल्या इथल्या संस्कृतीचा पाया खिळखिळा करून नव्या संस्कृतीसाठीची भक्कम पायाभरणी डॉ. आंबेडकरांनी केली. हे महाप्रचंड कार्य डॉ. आंबेडकरांनी केले आहे. हे करण्यामागे त्यांचे अपार, अद्‌भुत, अद्‌वितीय कष्ट आहेत. डॉ. शैल द्र ल डे म्हणतात, "डॉ. आंबेडकर हे प्रचंड विद्या व्यासंगी विचारवंत होते. विसाव्या शतकाच्या काळात त्यांच्याइतका विद्वान, उच्चशिक्षित, प्रकांडपंडित, बुद्धिमान व प्रज्ञावंत समाजकारणी व विचारवंत उभ्या भारतवर्षात नव्हता. आपल्या अपार बुद्धिवैभवाच्या व अतुलनीय विद्वतेच्या बळावर त्यांनी भारतामध्ये समाजकारण व राजकारण सुरू केले येथील तळपातळीवरील समाजाच्या मुक्तिकरिता त्यांनी परदेशी विद्यापीठांमधून अर्जित केलेले आधुनिक ज्ञान हेच अमोघ असे शस्त्र मानले. आणि या आधुनिक ज्ञानरुपी व अद्ययावत शिक्षणरुपी शब्दाच्या बळावर त्यांनी विविध विषयांवरील ग्रथांमधून, अनेकानेक संघटनांमधून, विविधांगी आंदोलनांमधून व चळवळींमधून संबंध भारतभर अभूतपूर्व असे जनजागरण व लोकप्रबोधन केले. त्यांनी केलेले हे जागरण व लोकप्रबोधन केवळ दीनदलित वर्गापुरते मर्यादित नव्हते, तर या जनजागरणाची व लोकप्रबोधनाची व्याप्ती समस्त भारतीय समाजाला व या भारतीय समाजाला व या भारतीय समाजातील सर्व स्तरांना व्यापून टाकणारी होती. डॉ. आंबेडकरांनी विविध साधनांच्या व विविध माध्यमांच्या आधारे चालवलेल्या या अतिव्यापक स्वरुपाच्या जनजागरणामधून व लोकप्रबोधनातून, भारतीय पातळीवर अभूतपूर्व स्वरुपाची समाज समीक्षा आकाराला आली त्याचबरोबर अनन्यसाधारण स्वरुपाची साहित्य समीक्षा व संस्कृती समीक्षा देखील आकाराला आली. समाज, धर्म, शिक्षण, अर्थव्यवहार, इतिहास यांच्याबरोबरच साहित्य व संस्कृती यांच्यासंबधीची नवी भूमिका त्यांच्या एकंदर ग्रंथलेखनामधून, विचारचिंतनामधून व कार्य कतृत्वामधून भारतीय पातळीवर अगदी नव्याने साकार झाली त्यामुळे भारतीय पातळीवर नवी साहित्यसंरचना व नवी संस्कृतीरचना निर्माणा होण्याची प्रक्रिया आधुनिक कालखंडात पहिल्यांदाच अस्तित्त्वात आली."[1] या प्रक्रियेचा प्रभाव संपूर्ण जगावर पडलेला दिसतो. आपापल्या देशातील संस्कृती विचार तपासून पाहण्याची प्रक्रिया गतिमान झालेली दिसते. आपले मूळ अस्तित्व, आपल्या जगण्याच्या वैचारिक प्रेरणा, श्रद्धास्थाने यांची नवी चिकित्सा

जगाची नव्याने मांडणी करीत आहेत.

या नव्या मांडणीचा परिणाम दिसून येत आहे. भारतीयांची एकंदर वाटचाल वैज्ञानिक विचारांकडे, समतेकडे, बंधुत्त्वाने राहणाऱ्या विचारसरणीकडे होत आहे. ही जागृती विलक्षण क्रांतिकारक आहे. वास्तववादी दाहक विचारांमुळे जुने टाकावू माणूसपणाला कलंक लावणारे सारे काही जळू लागले आहे. माणूस धर्मासाठी की धर्म माणसासाठी या प्रश्नाचे निश्चित उत्तर डॉ. आंबेडकरांनी दिले आहे ते म्हणजे– माणूस धर्मासाठी नाही तर धर्म माणसासाठी आहे. या विचारांचा प्रभाव संपूर्ण जगावर पडला आहे. आपापल्या देशातील धर्माची, संस्कृतीची नव्याने चिकित्सा सुरु झाली आहे.

भारताच्या जवळच असलेल्या श्रीलंका देशाने 'त्रिपिटक' या ग्रंथांना 'राष्ट्रीय ग्रंथ' म्हणून मान्यता दिली आहे. ही या नव्या वर्षाच्या पहिल्या आठवड्यातील घटना आहे, जी अत्यंत महत्त्वाची आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुतेवर आधारित नवी संस्कृती, नवी विश्वसंस्कृती असावी या दिशेने समाज जगाची वाटचाल सुरू झाली आहे. या नव्या संस्कृतीचे नवे स्वप्न सारे जग पाहू लागले आहे. ही संस्कृती भगवान बुद्धांच्या करूणेचा आधार घेऊन, शांततेचा आधार घेऊन निर्माण होत आहे. या संस्कृतीचे स्वरूपविशेष डॉ. विवेक घोडेराव यांनी असे नोंदविले आहेत. "तथागतांच्या विचाराने म्हणजे– समता, बंधुता, कारूण्य हे गुण अंगीकारून कुशल कर्म करीत, चित्तमळ साफ करीत, मंगलसुत्रांचे पालन करीत निघालेल्या खऱ्याखुऱ्या माणसांची, बुद्धविचार मनात रूजवून जगणाऱ्या माणसांची संस्कृती म्हणजे बुद्धसंस्कृती."[2] याप्रमाणे भारताची, जगाची संस्कृती आकार घेत आहे. याचे श्रेय डॉ. आंबेडकरांना द्यावे लागते. ही या शतकातील क्रांतिकारक वाटचालीची नवी दिशा आहे.

## मार्क्सवादी जगाचा द्रष्टेपणाने घेतलेल्या शोधातून सापडलेल्या सत्वसाराचा जगाला होत असलेला फायदा–

डॉ. आंबेडकरांनी मार्क्सवादी विचारांचा मूळातून अभ्यास केला होता. जगाला व्यापणारी ही विचारप्रणाली भविष्यात कशी आणि कितपत प्रभावी राहिल, जग या विचारांना स्वीकारतील की नाही? हे विचार कृतीत आणतील की नाही? या प्रश्नांची साधार उत्तरे डॉ. आंबेडकरांनी दिली आहेत. या उत्तरांमुळे प्रबोधनवादी चळवळींना, देशांना याचा प्रचंड उपयोग झाला आहे.

कार्ल मार्क्सने विरोधविकासी भौतिकवादावर मिमांसात्मक विचार मांडले आहेत. त्याचा गाभा गोविंद पानसरे यांनी मांडला आहे. ते लिहितात– "मार्क्सने भौतिकवादाचे विज्ञान बनवले. शास्त्र तयार केलं. बदलांना एक कारण परंपरा असते. मार्क्सने विश्वातील समाजातील भौतिक बदलांपाठीमागचा कार्यकारणभाव शोधून काढला. यामागची मार्क्सची तात्विक, वैचारिक भूमिका काय होती? समाज विकासाच्या प्रक्रियेत घडलेल्या बदलांचा अभ्यास करून, त्या बदलांमागील कारणं शोधून काढली तर आपल्याला उपयुक्त ठरतील. या अभ्यासाच्या आधारे समाजाच्या भविष्यातील विकासाला काही विशिष्ट दिशा देणं शक्य होईल. त्याच्या आधारे इथून पुढच्या काळात आपल्याला जग जसं घडवायचं आहे, तसंच घडविता येईल, अशी ही भूमिका आहे."[3] डॉ. आंबेडकरांनी मार्क्सच्या या भूमिकेची चिकित्सा केली आहे. कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानानुसार जग आर्थिकदृष्ट्या समान पातळीवरचे झाले तर सर्व माणसे सुखी होतील काय? याचे उत्तर नकारार्थी येते. भौतिकदृष्ट्या माणूस समृद्ध झाला तरी त्याच्या मानसिक स्वास्थ्यासाठी हे तत्त्वज्ञान पुढे कोणतेही पर्याय देत नाही, अशा परिस्थितीत बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची आवश्यकता भासेल. संपत्तीशिवाय किंवा संपत्तीसह साधली जाणारी मनाची शांतता, निर्मलता, चित्तशुद्धी यासाठी बुद्धाचे विचारच दिशादर्शक राहतील. धर्म गरिबीचे समर्थन करीत नाही, बौद्ध धम्मही नैतिकतेने सचोटीने जीवन जगण्यासाठी आवश्यक धन अर्जित करण्याचे समर्थन करतो. तसेच नैतिक आचरणाचीही अत्यंत आवश्यकता स्पष्ट करतो. डॉ. आंबेडकर म्हणतात– "कोणतीही समाजव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी त्या समाजव्यवस्थेला एकतर कायद्याचा किंवा नीतिमत्तेचा आधार घ्यावा लागतो. कायदा आणि नीतिमत्ता या दोहोंपैकी एखादी गोष्ट नसेल तर समाज टिकू शकत नाही. कोणत्याही समाजात कायद्याला कमी महत्त्व देण्यात आलेले असते. कायदे तोडणाऱ्यांना नियमानुसार शिक्षा करणे एवढाच कायद्याचा उद्देश असतो. बहुसंख्य समाजाला मात्र नैतिकतेचा आधार आणि अधिकाराच्या जोरावर जीवन जगण्यास भाग पाडण्यात आलेले असते. म्हणून नैतिकतेच्या अर्थाने जगण्याचा मार्ग या अर्थाने धर्माचा स्वीकार केला गेला आहे."[4] या अर्थाने बौद्ध धम्माचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले आहे. याबाबतचे सर्व संदेह दूर करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

मार्क्सवादाचा आधार घेऊन चाललेल्या सोव्हिएत रशियाचे विभाजन झाले. जवळ–जवळ 17 छोट्या

प्रदेशांमध्ये विभाजन झाले. या देशाची एकसंघता दुभंगली. भारत हा तर जातीपातींनी विभागलेला देश. अशा देशाला एकसंघ ठेवण्यासाठी लागणाऱ्या विचारधारेची ओळख त्यांनी या देशाला आणि जगाला करून दिली.

या त्यांच्या तत्त्वविचारांचा उपयोग समस्त जगाला होत आहे. होणार आहे. डॉ. आंबेडकरांनी बुद्धिमत्तेतून हे घडवून आणले आहे. प्राचीन वामयाचा अभ्यास, पूर्वसूरींची मत–मतांत्तरे टिका–टिपण्णी या साऱ्यांचे ससंदर्भ वाचन केल्यामुळे हे घडू शकले आहे. एक व्यक्ती आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर किती मोठी क्रांती करू शकते हे डॉ. आंबेडकरांनी जगाला दाखवून दिले आहे.

## आदर्श लोकशाहीचे आश्वासक चित्र, पायाभरणी आणि उभारणी यासाठी 'भारतीय संविधानाची' निर्मिती–

भारताचे संविधान हे भारताच्या ऐक्यासाठी, सामाजिक व राजकीयदृष्ट्या समतेकडे वाटचाल करण्यासाठी योग्य दिशा देणारे मार्गदर्शक आहे. भारतीय संविधानातील सुरुवातीस असलेल्या उद्दिशिकेमधून डॉ. आंबेडकरांची अजोड कामगिरी दिसून येते. या देशावर आणि जागावर ठेवलेले क्षण लक्षात येतात. उद्देशिकेमध्ये म्हटले आहे. "आम्ही भारताचे लोक एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक ज्ञान, विचार, अभिव्यक्ती विश्वास श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता; निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून आमच्या संविधानसभेत आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर 1945 रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण करत आहोत."[5] ही उद्देशिका म्हणजे माणसाचा मुक्त स्वातंत्र्याकडचा, स्वस्वप्नपूर्तीसाठीचा, समतेसाठीचा आणि माणूसपणाकडे जाण्या स्वयंसंकल्प आहे. स्वस्वातंत्र्याची महान अशी गर्जना आहे. तो सर्वसामान्यांच्या स्वातंत्र्याचा उद्‌गार आहे. हा उद्‌गार केवळ भारतीयांचा उद्‌गार नाही, तो मानवजातीच्या स्वातंत्र्याचा उद्‌गार आहे. ही वैचारिक देणगी डॉ. आंबेडकरांनी जगाला दिली आहे.

या महान देणगीमुळे वैचारिकदृष्ट्या जागे झालेले समस्त जगातील पिचलेले, मागे राहिलेले, वंशभेदाचा बळी ठरलेले लोक आपल्या जगण्याला नवी प्रेरणा देत आहेत.

दक्षिण आफ्रिकेतील लोकांनी स्वीकारलेली ही प्रेरणा प्रातिनिधिक आहे. दक्षिण आफ्रिकेतील घाना शहरातील विद्यापीठात शिकणाऱ्या 'ओबेट की कॉम्बन' यांनी नुकतीच जाहीर मागणी केली आहे. ही मागणी त्यांनी 'कार्व्हन' या मासिकाला दिलेल्या मुलाखतीमध्ये केली आहे. ती मागणी म्हणजे– 'घाना विद्यापीठात डॉ. आंबेडकरांचे शिल्प उभारणे!' ओबेराकी कॉम्बन हे परिवर्तनवादी चळवळीतील नेते आहेत. त्यांना डॉ. आंबेडकर यांचे जीवन, विचार, प्रेरणादायी वाटतात,

त्यांच्या विचारांमधून काळ्या अमेरिकन लोकांना नवी प्रेरणा मिळत आहे असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## डॉ. आंबेडकर आणि त्यांचे विचार आणि जगाची वाटचाल

डॉ. आंबेडकरांनी आपल्या विचारसरणीतून जगाला एक निश्चित दिशा दिली आहे, ती दिशादर्शकता खालीलप्रमाणे मांडता येते.

1. 'युनो' या जागतिक संघटनेने डॉ. आंबेडकरांचे मूलभूत विचार स्वीकारून आपल्या ध्येय धोरणांची निश्चिती केली आहे. डॉ. आंबेडकरांचे समतावादी, शांततावादी आणि बहुसंख्यांना न्याय देणारे विचार जगाला युद्धापासून रोखतील अशी खात्री 'युनो' ला वाटते.
2. डॉ. आंबेडकरांनी केलेली समग्र सामाजिक क्रांती, धर्मक्रांती आणि स्वातंत्र्याच्या न्याय हक्कांसाठीचा लढा या गोष्टी जगातील गुलामगिरीत जगणाऱ्या माणसांना नव्या प्रेरणा, नवे बळ देत आहेत. मानसिक गुलामगिरीतून वैचारिक गुलामगिरीतून त्यांची सूटका होत आहे.
3. शांतताप्रेमी धर्मांना नवी ताकद डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी दिली आहे. त्यामुळे कट्टर धर्मांधविचारवंत, प्रतिगामी विचार, घातक रूढी यांची नव्याने चिकित्सा करण्याची प्रक्रिया जगभर गतीमान झाली आहे.
4. भारत आणि जगातील साहित्यिकांना नवी प्रेरणा, नवी दिशा डॉ. आंबेडकरांनी दिली आहे. सामान्य माणूस आणि त्याचे प्रश्न हे केंद्रस्थानी आले आहेत. त्यामुळे साहित्याचा परिघ विशाल होत आहे. निग्रो साहित्य (Black Literature) आणि भारतीय साहित्य हे परस्पर संवादी आहेत यामागे या नव्या प्रेरणा ज्या डॉ.

आंबेडकरांनी दिल्या आहेत त्याच कारणीभूत आहेत.

5. एकंदर जगावर अनेक अंगांनी डॉ. आंबेडकरांच्या महान विचारांचा प्रभाव पडला आहे.

या विषयाची व्यापकता लक्षात येते. अनेक अभ्यासकांनी मिळून या विषयावर संशोधन, संकलन करण्याची आवश्यकता आहे. या विषयावरील हे चिंतन, हे संशोधन सुरुवात आहे असे मला वाटते.

## संदर्भ–


1. सिंह ब्रजेश (संपा.), 'लोकराज्य', मासिक एप्रिल–2018, संदर्भलेख– ल डे शैल द्र, 'परिवर्तनाचे अग्रदूत', पृ.20
2. अनमोल शेंडे (संपा.), रमाई, मी सावित्री! मी यशोधरा! आणि बारा समीक्षक, संदर्भलेख– घोडेराव विवेक युगसाक्षी प्रकाशन, प्रथमावृत्ती 2014, पृ.139
3. पानसरे गोविंद, मार्क्सवादाची तोंडओळख, श्रमिक प्रकाशन, प्रतिष्ठान कोल्हापूर, प्रथमावृत्ती 2010, पृ.21
4. डॉ. आंबेडकर भीमराव, बुद्ध आणि त्यांच्या धम्माचे भवितव्य, प्रकाशक– प्रदीप रोडगे, नागपूर, आवृत्ती–2012–2013, पृ.8 व 9
5. भाऊसाहेब रायभान काळे, भारताचे संविधान, सुधारित आवृत्ती, सत्यम प्रिंटर्स औरंगाबाद (पहिले पान)